महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४२ /२०२४ दि. १४/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी, कोनगाव** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १५/०३/२०२४ रोजी मा. श्री. राहुल गांधी, खासदार, कॉंग्रेस पक्ष यांचा भिवंडी शहरात दौरा नियोजित आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) दुर्गाडी चौक, कल्याण येथून रांजणोली नाका मार्गे नाशिक, भिवंडी व ठाणे कडे जाणाऱ्या जड अवजड, मध्यम, हलकी वाहने, सर्व प्रकारची माल वाहतूक वाहने यांना **दुर्गाडी** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** (अ) नाशिक कडे जाणारी वाहने दुर्गाडी येथून आधारवाडी – गांधारी – बापगाव रोड मार्गे नाशिक राष्ट्रीय महामार्ग येथे बाहेर पडून इच्छित स्थळी जातील.

(ब) ठाणे कडे जाणारी वाहने दुर्गाडी येथून गोविंदवाडी बायपास मार्गे पत्रीपूल – शिळफाटा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** दि. १५/०३/२०२४ रोजी भादवड नाका – साईबाबा जकात नाका – रांजणोली नाका परिसरात रस्त्याचे दोन्ही बाजूला कोणत्याही प्रकारचे वाहन पार्क करता येणार नाही.

सदर अधिसूचना दि. १५/०३/२०२४ रोजी दुपारी १३:०० ते १९:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.